# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११२ वा ❑ भारतीय सौर दिनांक २१ ज्येष्ठ शके १९४८, गुरूवार दि.११ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### ड्रग्सचा विळखा: महाराष्ट्राच्या सुरक्षेला गंभीर आव्हान

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्राच्या सुरक्षेसाठी अंमली पदार्थांचा (ड्रग्स) विळखा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय बनला आहे. विशेषतः मुंबई, पुणे, नाशिक आणि इतर प्रमुख शहरांमध्ये एमडी सारख्या सिंथेटिक अमली पदार्थांचा वाढता प्रसार युवा पिढीचे भविष्य उद्ध्वस्त करत आहे.महाराष्ट्रात वाढणारे अमली पदार्थांचे (ड्रग्ज) जाळे हा सध्या राज्यासमोर असलेला एक अत्यंत गंभीर आणि चिंताजनक प्रश्न बनला आहे. राज्याची आर्थिक राजधानी मुंबई, शैक्षणिक हब असलेले पुणे आणि नागपूर , चंद्रपूर जालना व इतर प्रमुख शहरे सध्या ड्रग्ज तस्करांच्या विळख्यात सापडल्याचे चित्र आहे.

ड्रग्ज माफियांना कठोर जरब बसवण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अर्थात मकोका कायद्यात सुधारणा करून व्यावसायिक स्तरावर ड्रग्ज तस्करी करणाऱ्यांवर हा कायदा लावण्यास सुरुवात केली आहे.तरी देखील राज्यातील अनेक शहरांमध्ये ड्रग्ज माफिया मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.

महाराष्ट्रात प्रामुख्याने मुंबई, नाशिक, पुणे, सातारा (सावरी), सांगली (कुपवाड, इरळी), सोलापूर, आणि अहिल्यानगर (श्रीरामपूर) या जिल्ह्यांमध्ये अमली पदार्थांचे (ड्रग्ज) कारखाने, साठे आणि मोठी तस्करी पकडण्यात आली आहे. विशेषतः ग्रामीण भागातील निर्जन शेतांमध्ये किंवा पत्र्याच्या शेडमध्ये एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स बनवण्याचे मोठे कारखाने पोलिसांच्या गुन्हे शाखेने उद्ध्वस्त केले आहेत.राज्यात गांजा किंवा चरस सारख्या पारंपरिक अंमली पदार्थांशिवाय एम.डी. आणि रासायनिक ड्रग्जचा वापर वेगाने वाढला आहे.

म्याऊम्याऊ या नावानेही ओळखले जाणारे एमडी हे रासायनिक ड्रग्ज कमी खर्चात उपलब्ध होत असल्याने तरुण आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये त्याचे प्रमाण वाढले आहे. तस्कर आता गांजाऐवजी सहज लपवता येण्याजोगे आणि अधिक नफा मिळवून देणारे रासायनिक ड्रग्ज तयार करण्यावर भर देत आहेत।

राज्यातील अनेक बंद किंवा आजारी रासायनिक कारखान्यांचा वापर छुप्या पद्धतीने ड्रग्ज बनवण्यासाठी केला जात असल्याचे उघड झाले आहे.

ड्रग्जची विक्री आता थेट रस्त्यावर न होता डार्क नेट आणि इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून कोडवर्ड वापरून केली जात आहे.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच अंमली पदार्थांच्या (ड्रग्ज) विक्रीच्या पद्धतींमध्येही मोठा बदल झाला आहे. आता रस्त्यावरील व्यवहारांऐवजी ऑनलाइन आणि गुप्त माध्यमांचा वापर वाढला आहे.

डार्क नेट हे इंटरनेटचे एक असे गुप्त नेटवर्क आहे, जिथे विशेष ब्राउझरशिवाय पोहोचता येत नाही. येथे अमली पदार्थांची खरेदी–विक्री क्रिप्टोकरन्सी (जसे की बिटकॉइन) वापरून केली जाते. यामुळे खरेदीदार आणि विक्रेते यांची ओळख पूर्णपणे लपून राहते. इन्स्टाग्राम, टेलिग्राम, स्नॅपचॅट आणि व्हॉट्सॲप सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर यासाठी सर्रास केला जातो. एजंट्स आणि ग्राहक थेट नावांचा उल्लेख न करता इमोजी आणि गुप्त कोडवर्ड्सचा वापर करतात. ड्रग्जची पाकिटे कुरिअर सेवा, पार्सल किंवा गुप्त डेलिव्हरी बॉयजच्या माध्यमातून ग्राहकांच्या घरापर्यंत पोहोचवली जातात. पैशांचे व्यवहार हे गुगल पे, फोन पे किंवा इतर ऑनलाइन वॉलेट्सद्वारे केले जातात, जेणेकरून कोणालाही संशय येणार नाही.अवैध अमली पदार्थांच्या या ऑनलाइन व्यापाराला आळा घालण्यासाठी सायबर सेल आणि नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो कडून सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कडक पाळत ठेवली जात आहे आणि अनेक कारवाया केल्या जात आहेत.

पुणे आणि मुंबईसारख्या शहरांमध्ये आयोजित होणाऱ्या बेकायदेशीर रेव्ह पार्ट्या तरुणांना या चक्रव्यूहात ओढण्याचे मुख्य केंद्र ठरत आहेत.

महाविद्यालयीन तरुण आणि शाळकरी मुले सहजपणे ड्रग्सच्या जाळ्यात ओढली जात आहेत. व्यसनाची पूर्तता करण्यासाठी तरुण वर्ग गंभीर गुन्हेगारीकडे वळत आहे.अमली पदार्थांच्या तस्करीतून मिळणारा काळा पैसा हा हवाला मार्फत देशविघातक कारवाया आणि दहशतवादाला बळ देण्यासाठी वापरला जाण्याची मोठी शक्यता आहे. महाराष्ट्रात केवळ अमली पदार्थांची विक्रीच नव्हे, तर ग्रामीण आणि निमशहरी भागात ड्रग्स बनवण्याच्या अवैध फॅक्टऱ्या चालविल्याचे अनेक कारवायांतून समोर आले आहे.

महाराष्ट्रातील ड्रग्स माफियांचे जाळे इतर राज्यांतही पसरले असून, नुकत्याच झालेल्या कारवाईत मीरा–भायंदर पोलिसांनी तेलंगणातील जहीराबाद (जिल्हा संगारेड्डी) येथे चालणारा २० कोटींपेक्षा अधिक किमतीचा एमडी ड्रग्सचा कारखाना उद्ध्वस्त केला आहे.

# भाषा संवर्धनाचे महाराष्ट्रातील प्रयत्न आदर्शवत – डॉ. पृथ्वीराज तौर

## इंडोनेशियात भाषातज्ज्ञांपुढे मांडली मराठीची थोरवी

ज्योतिर्मय साहित्य

नांदेड – जगभरातील भाषाप्रेमी आणि तज्ज्ञांनी महाराष्ट्र शासन व लोकसमूहाच्या मराठी भाषा जतन, संवर्धन, प्रचार, प्रसाराचा आदर्श घेतला पाहिजे व त्या दृष्टीने स्वभाषेसाठी प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर यांनी इंडोनेशियातील बुकीतिंगी, पश्चिम सुमात्रा येथे केले.

चौथ्या आंतरराष्ट्रीय मीनांगकाबाऊ साक्षरता महोत्सवात डॉ. तौर बोलत होते. अध्यक्षस्थानी पश्चिम सुमात्राचे राज्यपाल एच. महयेल्डी अंशारुल्लाह होते. इंडोनेशियाच्या राष्ट्रीय पुस्तकालयाचे महासंचालक प्रो.



अमिनुद्दीन अजीज यांनी बीजभाषण केले. आयएमएलएफ अध्यक्ष सास्त्री बाकरी यांच्यासह एलकेएएएमचे अध्यक्ष प्रो. डॉ. फौजी बहार, स्वित्झर्लंडच्या लौरा डी कोर्सिया, फेरी चोफा, फौजिया फौजान, डॉ. मुहम्मद रेजी यांनी यावेळी विषय मांडणी केली.

डॉ. पृथ्वीराज तौर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण२०२० मध्ये मातृभाषा व स्थानिक भाषा यांना देण्यात आलेले महत्त्वाचे स्थान, भारतीय ज्ञान प्रणालीमुळे बोलीभाषांना आलेले महत्त्व, महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले मराठी भाषा विद्यापीठ, मराठी भाषेचा अभिजात दर्जा, शासनाच्या वतीने करण्यात येणारे पाचशे पुस्तकांचे भाषांतर अशा विविध मुद्द्यांची सभागृहाला माहिती दिली. मराठी भाषेच्या जतन संवर्धनाच्या संदर्भातील शासनाचे व जनतेचे प्रयत्न अनुकरणयोग्य असून इतर देशांनी व बोली अभ्यासकांनी या प्रयत्नांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन डॉ. पृथ्वीराज तौर यांनी केले.

दिनांक ३ जून ते ७ जून या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या आंतरराष्ट्रीय महोत्सवात डॉ. पृथ्वीराज तौर यांनी एकूण तीन व्याख्याने दिली. यासोबतच जामगडांग येथे तौर यांच्या कविता वाचनाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवात सहभागी झालेल्या शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पृथ्वीराज तौर यांच्याशी संवाद साधला.

पश्चिम सुमात्रामध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या मिनांगकाबाऊ आंतरराष्ट्रीय महोत्सवाचे हे चौथे वर्ष असून ३७ देशातील १०० पेक्षा अधिक लेखकांना आयोजकांनी महोत्सवात आमंत्रित केले होते.

# भुर्र उडालेली ती चिमणी...!

ज्योतिर्मय साहित्य

..आणि विचारांच्या तंद्रीत चिमणीचे त्या खिडकीच्या दोन पडद्याच्या मधून सहज समोर लक्ष गेले. त्या उगवतीच्या दिशेला दूरवर विसावलेल्या ऑफिसच्या प्रांगणातल्या झाडांच्या सावल्या हळूवार जमिनीवरून सरकत चालल्या होत्या. तस तर तिचे नि उन्हाचे नाते जुनेच, पण आज त्यांचे ते निराळे जग निराळी भाषा चिमणीला काहीतरी खुणावत होती. तिच्या तंद्रीला मोडत ऑफिस मधली ती खुर्ची कर्र... कर्रर्र... करून उगीचच शांततेचा भंग करीत होती.

''चला काम आवरायला हवयं.'' (स्वतःशीच पुटपुटत)

हातात पेन घेऊन लिखा पडी करत फायली चाळायला सुरुवात केली. काम संपता संपता एक एक फाईल व्यवस्थित लावता, स्टॉपर खाली ठेवलेला तो कागद वाऱ्याने हलून लक्ष वेधून घेत होता. आणि चिमणी तो कागद हातात घेऊन वाचू लागली. अभिमानाने नाकपुड्या फुगवत तिची कॉलर ताठ झाली. मनाचा सुर भावनेत मिसळला. नि ते दोन थेंब गालावरून ओघळून

कौतुक सोहळा शब्दांवर पाझरले. हातातल्या रुमालाने ते टिपता टिपता, डोळ्यासमोरून कृषी विद्यापीठाच्या शेतातील ते हिरवगार गवत पाईप लाईन क्षणात डोळ्यासमोरून गेले. (हुंदका आवरता आवरता) विचाराच्या तंद्रीत...

दारावर टकटक झाली.

''मॅडम सहा वाजून गेले.''

''आ,'' ''हो हो,''

''इथलं, जरा दहा पंधरा मिनिटात आवरते, आणि निघते.''



''मॅडम ?''(स्वतःशी पुटपुटत) हरवून गेली. पाच दहा मिनिटात पुन्हा

फायलीची इकडे तिकडे आवरा आवर करत ती दाराबाहेर आली. विचाराच्या तंद्रीत तिने गाडीला किक मारली. बघता बघता वाऱ्याच्या गतीने चाके फिरू लागली. आकाशात घराच्या ओढीने जाणारे ते थवे भुर्रकन डोक्यावरून उडून चालले होते. साकवाच्या दिशेने वाटचाल करणारी चाके आणि चाका बरोबर हळू हळू डोंगरा आड चाललेला रविराज निषेच्या मांडीवर विसावला होता. साकवा वरून चालताना एका क्षणाला सोबत असणारा सूर्य नकळत गायब झाला. नदीच्या पाण्याला आणि दूर... डोंगरातल्या झाडांना काळोखाची आलेली ती सितलाई म्हणजे एक अपूर्व असा संगमच होता जणू... एका खूप मोठ्या संघर्षानंतरच जणू विसावलेला .

गिरीराजाच्या कडेला आलेली लाली, रविराजाच्या संधी कालात बुडून लुप्त होऊ पहात होती. निशा ने आपले पंख पसरून, धरती माय वर काळी शाल पांघरली. त्या शालीला उगवतीच्या दारातून येणाऱ्या रजनिशच्या शितलतेची किनार उमटली. घटकाभरानंतर जमीन मागे सरकत सरकत पावलांना खेचनारी ती ओढ आणि समोर दिसणारी गावाची ती वेस नजरेच्या टप्प्यात येवू लागली.

पण एवढ्यात ...

....चाळीस पंचेचाळीसच्या स्पीडने रस्त्यावरून चालणारी ती चाके त्या आवाजाने तीस चाळीसच्या स्पीडने चालू लागली. नव्हे नव्हे जवळ जवळ थांबलीच, गावाबाहेरच्या त्या वस्तीवर दोन काठीच्या साहाय्याने साडीने बांधलेल्या झोपाळ्यातल्या रडणाऱ्या त्या बाळाच्या आवाजाने,

....आणि माहित नाही का? जवळ जावून पाहू लागले, दुपट्याच्या आड गेलेला तो चंद्र दिसेनासा झाल्यामुळे इवल्याशा डोळ्यात पाणी तरळले. पण काही क्षणात तोंडवरचे कापड बाजूला सरकून आकाशातला तो चंद्र चांदण्या सारं सारं इवल्याशा डोळ्यात सामावून गेलं. एक नवी चमक त्याच्यात जाणवू लागली होती. त्याचे ते इवले इवले हात त्याला जणू धरू पहात होते.





एवढ्यात त्या चटचटच्या आवाजाने लक्ष वेधले गेले. चुलीतल्या धुराबरोबर हवेत उडणारी ती ठिणगी आणि तापलेल्या तव्याच्या तळाला चिकटलेली ती काजळी चमकून जणू हसत होती.(एक समज बरं का ! तव्याची काजळी हसू लागली की काहीतरी चांगले होते. कधीतरी कुठेतरी ऐकले होते.) आणि एवढ्यात कुठूनतरी डोळ्यासमोर

निवडुंगाच्या गच्च भरलेल्या काट्यातून लालभडक फुललेले ते फुल, आणि

कित्येक दिवसाच्या क्षुधे नंतर वाळवंटातल्या त्या हापासीच्या तोंडातून ठिपकनारा तो थेंब डोळ्यासमोर येऊन काही तरी सांगू पाहत होता.

..आणि तिथेच बाजूच्याच शेतात पाचट जळताना.. नकळत तोंडून किती विरोधाभास ना!

वाऱ्याच्या गतीने फिरणारी ती चाके जणू मनाच्या चक्राला ही वाऱ्याच्या गतीने फिरवू लागली. आणि वाऱ्याच्या गतीने वाहणारे मन भूतकाळातल्या त्या दहा अकरा वर्षा पूर्वीच्या दुपारवर विसावले.

का कोण जाणे! तेव्हा

... त्या दिवशी उन्हाच्या जळत्या वेळी.... ते भगभगनारे ऊन डोळ्यांना बघवत नव्हते. आई गं ! स्स.. स्स...डोळे गच्च मिटून....

पायात रुतलेल्या सडांब्याची धसाडी काढताना... काय माहित? कुठून ती अचानक डोळ्यासमोर आली. आणि.. त्या अकरा बारा वर्षांच्या मुलीच्या डोळ्यावरच्या त्या बटा ना सरकवत.. तो हात, तिच्या डोळ्यातली ती चमक खूप काही सांगू पाहत होती. त्या डोळ्यातली ती उर्मी... जणू..! उत्कंठेची अपूर्वाईच होती.. अवचित येऊन हरवलेल्या त्या सावल्यात अचानक डोळ्यासमोर येऊन उभी राहिली आणि.. ''भेटला तर म्हणायचं तुला आज वेळ.'' **(क्रमशः)**







## जात्यावरच्या ओव्या......

मावेना मांडवात
रुमालाचे जोड
सजन सोयर्यासाठी
भाऊ करी तडजोड ||६८५||

मावेना मांडवात
भांडे-कुंडे पितळाचे
लेकीच्या लग्नाला
मामा आलेत मायीचे ||६८६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३९



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'' हे आपल्याला कळते पण वळत नाही आणि आपला सुखाचा आणि समाधानाचा शोध सुरूच राहतो. प्रत्येक परिस्थितीत आपली सुखाची आणि समाधानाची व्याख्या बदलत जाते. मला नोकरी लागली म्हणजे मी सुखी होईल, माझ्या पगारात वाढ झाली म्हणजे मी सुखी होईल, माझ्याकडे आज जी चारचाकी आहे, उद्या त्यापेक्षा आणखी चांगल्या प्रकारचे वाहन आले म्हणजे मला समाधान लाभेल. आणखी जमीन, आणखी घरे, बंगले यासारख्या गोष्टी माणूस मिळवण्यासाठी माणूस धडपड करतो आणि त्यासाठी आयुष्यभर धाव धाव धावतो. परंतु त्याची हाव संपत नाही. कुठे थांबायचे हे त्याला कळत नाही.



एका शेतकऱ्याची गोष्ट फार सुंदर आहे. तो आपल्या शेताच्या बांधावर आरामात झोपला होता. त्याची एका मोक्याच्या ठिकाणी शेतजमीन होती. शहरातून आलेला एक कारखानदार ती जमीन विकत घेऊन तिथे कारखाना काढण्याच्या तयारीत होता. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला ,''तू मला ही जमीन दिलीस तर मी तुला भरपूर पैसे देईन. तू श्रीमंत होशील.'' शेतकऱ्यांनी विचारले,''भरपूर पैसे मिळाल्यावर आणि श्रीमंत झाल्यावर काय होईल ?'' जमीनदार म्हणाला,''वेडा आहेस का ?अरे, तू अत्यंत समाधानात राहशील.'' शेतकरी म्हणायला,''मग त्यासाठी जमीन विकायची काय गरज आहे ? मी आत्ता देखील समाधानीच आहे.'' एका सामान्य शेतकऱ्याला जी गोष्ट कळली ती आपल्याला कळत नाही.

परमेश्वर प्राप्तीच्या आड जर काही येत असेल तर ते म्हणजे आपले मन ! आपले मन अतिशय चंचल आहे आणि ही गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे. म्हणून तर एका गाण्यात म्हटले आहे, '' माझिया मना जरा जरा थांब ना, तुझे धावणे अन् मला वेदना !'' म्हणून समर्थ म्हणतात की आपले हे चांचल्य म्हणजे चंचलता भगवंताला अर्पण करून आपली चित्त त्याच्याकडे केंद्रित करावे. त्याचे ध्यान लागावे.

गीतेत भगवंत म्हणतात ''सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज'' सर्वधर्म म्हणजे आपली सुखदुःखे, कर्म, वासना आदी सगळे भगवंताला अर्पण करून त्याला शरण जावे. तो आनंदनिधान आहे. अक्षय सुख आणि समाधान त्याच्याच ठायी आहे.

स्वसंवाद : १) मी ज्या सुखाच्या शोधात धावत आहे, ते खरोखरच मला समाधान देणारे आहे का? की ही केवळ अंतहीन धावपळ आहे?

२) माझ्या मनातील चंचलता, अपेक्षा आणि असंतोष मी कधी परमेश्वराला अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे का?


३) ''समाधान'' ही बाह्य गोष्टींमध्ये नसून अंतर्मनात आहे हे मला खरेच पटले आहे का?

(क्रमशः)



## || अभंग-माधव ||


माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



वास्तू म्हणे तथास्तु

आपले बोलणे । वास्तू ऐकतसे ।
उत्तम साजेसे । नित्य बोला ॥१॥
चांगले बोलता । आपुली ही वास्तू ।
म्हणते तथास्तु । भले होते ॥२॥
वाईट बोलता । जर का ही वास्तू ।
म्हणाली तथास्तु । पंचाईत ॥३॥
आपुल्या घरात । सदा बोला शिव ।
घ्या हरीचे नाव । तुम्ही सदा ॥४॥
माधव हा म्हणे । ऐका हो सकळ ।
बोलूया निर्मळ । सदोदित ॥५॥

## नाम सहजपणे येणे याचे नाव अजपाजप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

एक चांगला गृहस्थ होता. त्याला कसलेही व्यसन नव्हते. त्या गावात एक दिवस एक बुवा आला. या सद्गृहस्थला भविष्याचा नाद होता. त्याला कुणी सांगितले की, हे आलेले बुवा भविष्य अती उत्तम सांगतात. तो त्यांना भेटायला गेला, परंतु ते गांजा ओढीत होते. त्याला काही तो वास सहन झाला नाही. तरीही, भविष्य ऐकण्यासाठी म्हणून तो एका कोपऱ्यात बसून राहिला. असे बरेच दिवस गेले. होता होता त्याला बुवा फार आवडू लागले; त्याप्रमाणे तो रोज तिथे जात असे. एक दिवस बुवांनी सांगितले म्हणून त्याने चिलमीत निखारा ठेवला; दुसरे दिवशी फडके ओले करून दिले. पुढे त्याला एकदा बुवांनी सांगितले म्हणून त्याने एक झुरका घेऊन पाहिला; आणि हळूहळू सवयीने तो इतका तरबेज झाला की त्याने गांजा ओढण्यात गुरूलाही मागे टाकले ! असा हा संगतीचा परिणाम फार मोठा होत असतो. ज्याची संगत केली असता भगवत्प्रेम प्रकट होते, तो संत जाणावा. अशाची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. श्रीरामप्रभूला आवडणारे ' नाम ' घेऊन मारुतिरायांनी त्याला आपलासा करून घेतला. ते नाम तुम्ही अत्यंत श्रद्धेने घ्या, भगवंताला आपलासा करून घेणे तुम्हालाही अगदी शक्य आहे. नाम कोठेही घ्या, कोणत्याही वेळी घ्या, कितीही हळू घ्या, पण ते श्रद्धेने घ्या, म्हणजे ते भगवंतापर्यंत खात्रीने पोहोचू शकेल. परमेश्वराच्या प्राप्तीसाठी प्राणायाम, योगासने इत्यादि साधने सांगितलेली आहेत. परंतु त्याहून जास्त महत्त्वाचे म्हणजे भगवंताची सहजभक्ती. भगवंताचे नाम सहजपणे येणे याचेच नाव ' अजपाजप ' होय. हा भक्तीचा प्रकार अत्यंत श्रेष्ठ आहे. यात मीपणाचा शेवट आहे. मीपणा जाणे हीच भगवंताशी खरी अनन्यता होय. भगवंताची पूर्ण कृपा म्हणजे भगवंताशी एकरूपताच होय. परमार्थ म्हणजे आपली 'सहजावस्था' झाली पाहिजे; आणि तशी व्हायला अंतरंगाची ओळख करून घ्यायला पाहिजे, म्हणजेच अंतर्मुख बनायला पाहिजे. भगवंताच्या नसणेपणाने उठलेले वारे म्हणजे काळजी होय. मनुष्याच्या सर्व दुःखांवर, आजारांवर, आनंद आणि समाधान हे खरे औषध आहे. जो सदाचरणात आणि भगवंताच्या नामात राहतो, त्याला हे औषध सहजी लाभत असते. या औषधाचा परिणाम नकळत आणि सहजी होत जाऊन तो शेवटपर्यंत टिकून राहतो. आनंदमय राहण्याकरिता भगवंत हवा. भगवंताकडून येणारी शांती हेच समाधान होय. मन आणि भगवंत यांना जोडणारी साखळी म्हणजे नाम. या नामात आपले सर्वस्व गुंतवले तर आपल्याला भगवंतापर्यंत सहज जाता येईल.

नामाच्या आनंदाचा झटका आला की मनुष्य स्वतःला विसरेल आणि जगालासुद्धा विसरेल.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

. ♦संतबंका महाराज♦

संतांच्या संगतीत प्रेम भाव दाटून येतो. त्यांच्या तपश्चर्यकडे पाहिले, त्यांच्या भक्तीतील उच्च स्थानाकडे पाहिले तर, त्यांच्याशी कसे मर्यादेने वागावे हे मला कळत नाही . अशा संतांचे स्थान उच्च आहे ,त्यांची योग्यता थोर आहे. त्यांचेशी मर्यादेचे वागावे हे जाणुन ही त्यांच्याशी सलगीने वागावे असेच खूप वाटते. अशा संतांच्या संगतीत देहभान हरपून ,नाम संकीर्तन करायला खूप आनंद येतो. असे दिव्य क्षण हे दिवाळी सारखे सर्वश्रेष्ठ आनंद देणारे ठरतात.

आजी सोनियाचा दिवस/ दृष्टी देखीले संतास/ जीवा सुख झाले/ माझे माहेर भेटले/ अवघा निरसला शीण/ देखता संत चरण/ आजी दिवाळी दसरा/ सेना म्हणे आले घरा//

. ♦संत सेना महाराज♦

ज्या संतांच्या सानिध्यात रजो गुण आणि तमोगुण हे लीन होऊन सत्वगुणात वृद्धी होते. असा संतांचा सहवास असावा. अशा संतांच्या मांदियाळीत संसाराचा आलेला शिण नाहीसा होतो. प्रभुभक्ती फुलते, आनंदाचे उधान येते. असे क्षण म्हणजेच दिवाळी दसरा असे संत सेना महाराज सांगतात.

*धन्य आजी दिन/ झाले संताचे दर्शन// झाली पाप तापा तुटी/ दैन्य गेले उठा उठी// जाले समाधान/ पायी विसावले मन //तुका म्हणे आले घरा/ तोच दिवाळी दसरा //

## || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

✍ संस्कार

प्रत्येक शाळेतून व घरात मुलांवर लहानपणी संस्कार होणे गरजेचे आहे, संस्कारच आयुष्य जगण्यास समृद्ध करतात, ज्याच्यावर संस्कार नाहीत त्याचे जगणे अनाथ असल्यासारखे आहे.

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "जीवनाची व्याख्या काय?"

सर्वात सुखी व दुःखी माणूस कसा पाहिजे तर जो आपली किंमत स्वतःच ठरवितो, तो सुखी, आणि ईतरासी तुलना करणारा दुःखी! पाऊस पाणी
एकच पण एकाचे शेत उध्वस्त होते, दुसर्याचे पीक चांगले येते.
लोखंडाला कठीण व मजबूत सामर्थपूर्ण बनवण्यासाठी लोहार्याच्या भात्यात आधी लालबूंद व्हावे लागते. नतंर हातोड्याचे घाव.
अशीच जीवनाची व्याख्या बनते. पुस्तकी ज्ञानविद्याने आपण समाजात वागतो. व तसे वर्तन करतो. कुणाच्या वाईट वागण्याने वा शापाने
आपलं काहीच वाईट होत नसतं किंवा होत नाही. हे ज्याचे त्याचे कर्म, विधिलिखित असते. म्हणून लोकप्रिय होण्यासाठी मला कोणाची गरज नाही हा गर्व आणि सर्वांना माझी गरज आहे हा भ्रम टाळावा! स्त्रीपुरुष दोघांनीही हे समजून घ्यावे.
मिळेल तेच जे पेराल. या तरंगाचे परिणाम कमी करण्यासाठी आपण कुठे चुकलो याचा अभ्यास करा. त्याच्या चुका तिथेच सोडा.हीच आहे जीवनाची परिभाषा! सो स्टे फीट. गूड़ डे, व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो. सर्वांना दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.





## कशासोबत काय खावे

ज्योतिर्मय साहित्य

५. थालीपीठ आणि लोणी/दही

विज्ञान: थालीपीठ हे भाजणीपासून बनवले जाते, ज्यात अनेक प्रकारची धान्ये आणि कडधान्ये असतात. यात कांदा, कोथिंबीर आणि पालेभाज्या घातल्यामुळे फायबरचे प्रमाण वाढते. लोण्यासोबत खाल्ल्याने ते एक संतुलित जेवण ठरते.

काही महत्त्वाच्या टिप्स (भारतीय संदर्भात):

पालेभाज्यांची सुरुवात: जेवण सुरू करताना आधी वाटीभर पालेभाजी किंवा कोशिंबीर खाण्याची पद्धत (उदा. मेथीची भाजी किंवा काकडीची कोशिंबीर) ग्लुकोज नियंत्रणासाठी सर्वोत्तम आहे.

ताक: जेवणानंतर किंवा जेवताना ताक पिणे हे साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते.

कडधान्ये: उसळ किंवा मोड आलेली कडधान्ये जेवणात समाविष्ट केल्याने प्रथिनांचा कोटा पूर्ण होतो, जो ग्लुकोज गॉडेसच्या मते अत्यंत आवश्यक आहे.

भारतातील भौगोलिक परिस्थितीनुसार बदलणाऱ्या या आहारात संतुलन हाच मुख्य मंत्र आहे.

*''रक्त संचालन''(ब्लड सरक्यूलेशन)

दररोज २०० - ४०० टाळ्या वाजवा आणि कायम स्वरुपी स्वास्थ्य मिळवा.

रोज ४०० टाळ्या वाजवल्याने संधिवात, गाउट, आमवात, बरा होतो. टाळ्या वाजवल्याने हाताचे रक्ताभिसरण जलद होते. ब्लड फ्लो वाढतो. ज्याने थेट नसा ऍक्टिव्ह होउन गाउट बरा होतो.

हॅन्ड पॅरालिसिस म्हणजे हाताचा लकवा, हात थरथर कापणे, हे सर्व सकाळ, संध्याकाळ ४०० टाळ्या वाजवल्याने ५ - ६ महिन्यातच बरा होतो.

इंटर्नल ऑर्गन्स ह्रुदयरोग, फुफ्फुसांचे, आजार, यक्रुताचा आजार, रोज सकाळ, संध्याकाळ ४०० टाळ्या वाजवल्याने बरे होतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

रोग प्रतिकार शक्ती वाढते, कारण रक्तसंचार वाढल्याने प्रत्येक अवयव प्रभावित होतो.

टाळ्या वाजवल्याने डोकेदुखी, अस्थमा, मधुमेह, नियंत्रणात राहतो, क्लापिंग सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक समस्या नियंत्रणात ठेवतात.

हेअर फॉल व सर्व प्रकारच्या केसांसंबंधित विकार बरे होतात. कारण, हाताचा अंगठा, व बोटांच्या शिरा, नसा, या डोक्याशी जोडलेल्या असतात.

रोज जेवणानंतर ४०० टाळ्या वाजवल्याने सर्व आजार बरे होतात. फालतू चर्बी, मेद झडतो, ओबेसिटी दूर होते. टाळ्या वाजवल्याने स्मरणशक्ति वाढते.

शरिराचे सर्व जोडबिंदू हे हाताच्या बोटांशी जोडलेले असल्याने, टाळ्या वाजवल्याने हेल्दी बॉडी , फिट माईंड शरीर स्वस्थ, निरोगी राहते.

टाळ्या कशा व कधी वाजवाव्यात...

टाळ्या वाजवणाच्या आधी हाताला बदामाचे, देशी गाईचे तूप, किंवा खोबरेल तेल लावावे. रोज सकाळी २०० व संध्याकाळी २०० टाळ्या वाजवाव्या.

२०० टाळ्या हात वर करून वाजवा आणि २०० टाळ्या सामान्य स्थितित उभे राहून वाजवा.

आपले पूर्वज हे ज्ञानी, हुशार होते, त्यांना माहित होते की मनुष्य हा धर्माशी जोडलेले प्रत्येक काम नक्की करतो, म्हणून मग देवपुजेनंतर आरती करतांना टाळ्या वाजवण्याची प्रथा सुरू झाली.

***

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

पहिला पाऊस

पहिला पाऊस सुरु
शांततेत हा होता
मन आनंदी झाले
सुगंध दरवळे पहा
मातीचा किती छान
भिजण्या बाहेर ओढावले

हळूवार आकाशात जमलेले
ढग काळेभोर पाहूनी
हुरहूर मनी दाटली
जोराच्या गार हवेचा
स्पर्श होता अवनीवरी
पहिली पाऊसधार बरसली

# “खरा शेतकरी असशील तर फास गळ्याला लावू नको...”

**मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या कवी संमेलनात शब्दांनी दिला जगण्याचा आधार**

**कविता, गझल आणि सामाजिक वास्तवाच्या अभिव्यक्तीतून साहित्यप्रेमी मंत्रमुग्ध; संवेदना, संघर्ष आणि आशावादाचा सुरेल संगम**

**ज्योतिर्मय साहित्य**

जालना - खरा शेतकरी असशील तर
फास गळ्याला लावू नको, प्रेमवीर असशील
तर मदिरेच्या वाटेला जाऊ नको,
बरं नाही यार पिणे विषाचा प्याला,
जग म्हणेल उद्या हरला म्हणून मेला...
स्पर्धा कर स्वतःशी, जग तुझ्या मुठीत येईल,
वादळाने वाहून गेलं जरी एक पीक,
पुन्हा पेरलं की मातीमधून उगून येईल...‘‘

कवी कृष्णा कदम यांच्या या आशावादाने भरलेल्या ओळींनी मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या वतीने आयोजित निमंत्रित कवी संमेलनात उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला.

जालना येथील विद्युत कॉलनीमध्ये ज्येष्ठ गझलकार सुनील लोणकर यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या मृगाच्या स्वागतानिमित्त या काव्यमैफलीत सामाजिक वास्तव, मानवी वेदना, निसर्ग, प्रेम, संघर्ष आणि आशेचे विविध रंग शब्दातून खुलले.

कवी कृष्णा कदम यांनी जगण्याला नवी दिशा देणाऱ्या कवितांसह ‘‘वेदना तुझी इतकी खोल यावी, आभाळा तुझी मातीपर्यंत ओल यावी...‘‘ ही रचना सादर करत भेगाळलेल्या भूमीच्या वेदना आणि पावसाच्या प्रतीक्षेतील शेतकऱ्यांचे भावविश्व उभे केले.



कवी गणेश खरात यांनी ‘‘अखेर कविता सापडली...‘‘ या कवितेतून भाकरीच्या संघर्षात हरवलेल्या स्वप्नांचा वेध घेतला. ‘‘भाकरीच्या मागे धावताना खूप दमछाक व्हायची माझी...‘‘ या ओळींनी सर्वसामान्यांच्या जगण्याचे वास्तव मांडले. त्यांच्या ‘‘माती म्हणे आभाळाला, थोडं मनातले बोल...‘‘ या कवितेने निसर्गाशी संवाद साधला.

कवी दिगंबर दाते यांनी ‘‘पत्ते पिसून झाल्यावर...‘‘ या कवितेतून सुख-दुःखाच्या क्षणभंगुरतेवर भाष्य केले, तर ‘‘आज गडे सये आपण डोळ्यांनीच बोलू...‘‘ या प्रेमभावनेने ओतप्रोत रचनेने रसिकांना भावविश्वात नेले.

प्रा. एकनाथ शिंदे यांनी ‘‘कर्जमाफी‘‘ या कवितेतून शेतकऱ्यांच्या आयुष्याचे विदारक वास्तव मांडले. ‘‘खाचा झालेल्या निस्तेज डोळ्यात रंगवतो तो उद्याची भंग पावणारी स्वप्न...‘‘ या ओळींनी उपस्थितांना अंतर्मुख केले. कवी संमेलनाचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध मराठी, हिंदी आणि उर्दू कवी मनीष पाटील यांनी ‘‘वेदनेच्या उंबरठ्यावर रेंगणाऱ्या पिलावळी...‘‘ या कवितेतून उपासमार आणि अस्वस्थतेचे चित्र रंगविले. तसेच ‘‘एक ऐसी आवाज...‘‘ या हिंदी रचनेतून मानवी मनातील संघर्षाचे प्रभावी दर्शन घडविले. प्रा. पंढरीनाथ सारके यांनी ‘‘एक चंद्र आहे पण हरवलेला...‘‘ या रचनेतून एकाकीपणाची भावना व्यक्त केली. अस्वस्थकार कवी कैलास भाले यांनी ‘‘भूमिका‘‘ या कवितेतून जंगलतोड आणि पर्यावरणाच्या विनाशाविरुद्ध तीव्र शब्दांत भूमिका मांडली. ‘‘वाळवंट वाढल्याशिवाय राहणार नाही...‘‘ या इशाऱ्याने त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. हिंदी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त शायर अब्दुल रहीम अरमान यांनी ‘‘खून पानी की तरह बहता हुआ पाया था...‘‘ ही गझल सादर करून समाजातील हिंसाचार आणि शांततेची गरज अधोरेखित केली. प्रा. बी. जी. श्रीरामे यांनी ‘‘माय धरणी तापली...‘‘ या रचनेतून निसर्गाच्या बदलत्या रूपाचे चित्रण केले.

ज्येष्ठ गझलकार सुनील लोणकर यांनी प्रास्ताविकातून काव्य आणि संवेदनशीलतेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी डॉ. प्रभाकर शेळके यांनी केले. कवी शिवाजी तेलंगे यांनी आभार मानले.या कार्यक्रमासाठी मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे मार्गदर्शक रमेश देहेडकर, सुधाकर वाहुळे,मनोज लोणकर,विजय लोणकर,सौ.अर्चना लोणकर, श्री रोहीदास पाटील, नागनाथ सौंदर्य, विद्युतनगरवासी यांनी परिश्रम घेतले.शब्दांच्या माध्यमातून जगण्याला नवी उमेद देणारे, सामाजिक वास्तवावर भाष्य करणारे आणि संवेदनांना साद घालणारे हे कवी संमेलन जालन्यातील साहित्यप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरले.



## छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराने मनोज अग्रवाल सन्मानित

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : रमेश गरवारे सभागृह वाई सातारा येथे पार पडलेल्या पाचव्या मृग नक्षत्र मराठी साहित्य संमेलनात साहित्यिक मनोज अग्रवाल यांना छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, प्रशस्तीपत्र, मानाचा फेटा, फोटो फ्रेम, अक्षरधन असे पुरस्काराचे स्वरूप आहे. के.इ.एस. पब्लिकेशन महाराष्ट्र राज्य आणि विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था वाई सातारा यांच्यातर्फे आयोजिलेल्या मराठी साहित्य संमेलनात सदरील पुरस्कार देण्यात आला. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री. नागनाथ डोलारे हे होते. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी के.इ.एस.पब्लिकेशन कोल्हापूर या प्रकाशनाचे संस्थापक अध्यक्ष कवी सरकार इंगळी हे होते. विद्यानिकेतन शासकीय सामाजिक व शैक्षणिक संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेचे प्रमुख श्री शशिकांत कांचोळे उद्घाटकपदी होते

मनोज अग्रवाल यांचा चैतन्यवेल हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. तसेच त्यांनी अनेक कथा, कविता आणि शैक्षणिक व सामाजिक लेख विविध वर्तमानपत्र, साप्ताहिक आणि दिवाळी अंक यामध्ये लिहिलेले आहेत.अनेक कवी संमेलनामध्ये उत्कृष्टपणे कवितांचे सादरीकरण केलेले आहे. तसेच साहित्य संमेलनात कथाकथन देखील केलेले आहे. त्यांचे दोन कथासंग्रह, दोन कवितासंग्रह, एक ललित लेख संग्रह आणि कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

ज्येष्ठ साहित्यिक श्री.नागनाथ डोलारे, श्री. शशिकांत कांचोळे, कवी सरकार इंगळी व उपस्थित इतर मान्यवरांनी मनोज अग्रवाल यांचे अभिनंदन केले. तसेच छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे आयुक्त श्री अमोल येडगे सर, उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख श्री अंकुश पांढरे सर, शिक्षणाधिकारी श्री भारत तीनगोटे सर, प्रशासन अधिकारी श्री संजीव सोनार सर, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी श्री ज्ञानदेव सांगळे सर, शिक्षण विस्तार अधिकारी श्री विजय कोल्हे सर, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती रईसा बेगम मॅडम, साहित्य, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच मित्रपरिवार आणि नातेवाईक यांच्याकडून मनोज अग्रवाल यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## ताज्या बातमीचा अचूक वेध...

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा (दिपक पवार, चिंधवली) काल अचानक आलेल्या वळीव पावसाने आणि वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळे त्यांची पळता भुई झाली,

जो तो मिळेल तिकडे आडोसा घेण्याचा प्रयत्न करत होता, पण त्यांच्या पळण्यापुढे वाऱ्याचा वेग अति प्रमाणात असल्याने आणि पाऊसाचा मारा यामुळे त्यांची पुरती दमछाक झाली, जे आडोश्याला गेले ते वाचले, जे राहिले ते नाहक बळी गेले.

इतके दिवस सर्वदूर आपले अधिराज्य गाजवून स्वताच अस्तित्व निर्माण करत दहशत माजवून लहानपणापासून मोठ्यांपर्यंत, अगदीच सांगायचे झाले तर त्यांनी गुराढोरांना सुद्धा सोडले नाही,


वाटलं होतं ते कमी होतील पण कसलं काय संपूर्ण उन्हाळ्यात दहशतीने, प्रतिहल्याने अडचणी निर्माण केल्या, यांच्यामुळे अनेकांना आर्थिक झळ सुद्धा बसली, पण दैव बलवत्तर म्हणून अचानक आलेल्या वळीव पावसाने यांची पुरती दाणादाण उडवून दिली, इथंतिथं आडोश्याला लपले ते वाचले, जे हैदोस माजवण्यासाठी बाहेर पडले ते सापडले आणि तुफान वाऱ्याच्या माऱ्यापुढे दूरवर फेकले गेले, जे फेकले गेले ते कायमचे संपले गेले, बघता बघता बळींचा आकडा वाढला त्यामुळे अनेकांनी सुटकेचा निःश्वास टाकला...

अशा या महाकाय डास ऊर्फ मच्छरांचा काल बऱ्यापैकी नायनाट झाला... थॅक्स आदळाआपट करून येणाऱ्या पावसा. ताजी बातमी, क्षणभर आनंदासाठी. सातारा जिल्ह्यातील, वाई तालुक्यात असलेल्या चिंधवली परिसरात झालेल्या वळीव पाऊसाची घडामोड.

## साने गुरुजी

**ज्योतिर्मय साहित्य**

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सद्‌भावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे.



त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे


या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**




तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**



## मुलांसाठी लघु बोधकथा

### ♦ राजा आणि संत ♦



एका वनात दोन संत राहत होते. एकांतात आपल्या तपश्चर्येत लीन राहत होते. कधीतरी यात्रेकरूंचा जत्था जायचा तेव्हा ते संत त्यांच्याशी बोलत असत. त्याच यात्रेकरूकडून त्यांना तेथील राजास त्या संतांबाबत माहिती मिळाली. तो या दोघांना भेटण्यास निघाला.

जेव्हा संतांना ही गोष्ट कळाली. तेव्हा त्या दोघांना वाटले की आता राजा येणार व त्याने आपला चांगूलपणा पाहिला तर तो आपणास सतत भेटण्यास येईल, त्याच्याबरोबर अनेक माणसे येतील, त्यां माणसांच्या संगतीने अजून काही माणसे येतील व अशाने या वनातील शांती भंग पावेल व एकांत मिळणार नाही व एकांत नसल्याने आपणास ध्यानसाधना करता येणार नाही. राजा आम्हाला दोघांना सामान्य माणूस समजेल असे काहीतरी केले पाहिजे.

राजाचा लवाजमा तेथे पोहोचला तेव्हा राजाने पाहिले की ते दोघेही संत हातात लाठ्याकाठ्या घेऊन एकमेकांशी भांडत होते. पहिल्या संताने दुस-याला म्हटले, "तू स्वत:ला कोण समजतोस, मी इतके ज्ञान मिळविले आहे की ते तू सात जन्मातही मिळवू शकणार नाही." दुसरा संत त्यावर म्हणाला, "अरे तू तर पक्का खोटारडा आहेस, तुझ्या ज्ञानाच्या गप्पा मारून तू लहान मुलाला फसवू शकशील पण मला नाहीस. तुझ्यापेक्षा जास्त ज्ञान मी माझ्या शिष्यांना दिले आहे." राजाने व त्याच्याबरोबरच्या लोकांनी हे भांडण पाहिले व विचार करू लागले हे साधू संत तर सामान्य माणसाप्रमाणेच भांडत आहेत व त्यांनी सर्वांनी असल्या साधूसंतांचा संग नको म्हणून वनातून जाणेच पसंत केले. राजा व लोक जाताच दोन्ही संतांनी एकमेकांकडे पाहून मंदस्मित केले व गळाभेट घेतली. दोन्हीही साधू आपल्या साधनेत रममाण झाले.

तात्पर्य : चांगली गोष्ट घडवून आणण्यासाठी कधीकधी चुकीच्या मार्गाचाही अवलंब करावा लागतो.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात भारताची वाटचाल

ॲड.प्रा. कौशिक म. हरणे. मो.- 96731 75197






कालच्या भागावरून पुढे.....

ज्या कामांमुळे भारताला जागतिक आयटी क्षेत्रात स्थान मिळाले, त्यातील अनेक कामे आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रणाली काही क्षणांत करू लागल्या आहेत.

तथापि, हे संकट नसून परिवर्तनाची संधी आहे. भारताकडे जगातील सर्वात मोठ्या तरुण लोकसंख्येपैकी एक आहे. दरवर्षी लाखो अभियंते, डेटा सायंटिस्ट, संशोधक आणि तंत्रज्ञानतज्ज्ञ उद्योगक्षेत्रात प्रवेश करतात. भारतातील स्टार्टअप परिसंस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या परिसंस्थांपैकी एक मानली जाते.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फिनटेक, हेल्थटेक, ॲग्रीटेक, एडटेक आणि डीपटेक क्षेत्रात हजारो उद्योजक नवनवीन उपाय विकसित करत आहेत.

विशेष म्हणजे भारताकडे जगातील सर्वात मोठा डिजिटल ग्राहकवर्ग, विशाल डेटा आणि विविध भाषिक-सांस्कृतिक परिसंस्था आहे.

भारतीय भाषांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स मॉडेल्स विकसित करणे, कृषी क्षेत्रात स्मार्ट तंत्रज्ञान आणणे, आरोग्यसेवा ग्रामीण भागापर्यंत पोहोचवणे, न्यायव्यवस्था आणि प्रशासन अधिक कार्यक्षम बनवणे यामध्ये भारत जागतिक नेतृत्व करू शकतो. यासाठी सरकार, उद्योग, संशोधन संस्था आणि विद्यापीठे यांनी एकत्रितपणे दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज आहे. भारतात सेमीकंडक्टर उत्पादन, डेटा सेंटर्स, संशोधन व विकास, उच्च कार्यक्षम संगणन (High Performance Computing), तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे शिक्षण आणि नवउद्योजकतेला चालना देणारी परिसंस्था उभारणे ही काळाची गरज आहे. यासोबतच शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, मशीन लर्निंग आणि संगणकीय विचारसरणी यांचा समावेश करणे अत्यावश्यक ठरणार आहे. उद्याची स्पर्धा केवळ पदव्यांची नसून कौशल्यांची देखील असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी शोधणारे नव्हे तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनविण्यावर भर द्यावा लागेल. आज जगभरातील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या संशोधनावर करत आहेत.

क्रमशः..... पुढील भाग उद्याच्या अंकात




## आले (अद्रक) बेणे प्रक्रिया आणि साठवणूक : यशस्वी शेतीचे सूत्र

आल्याचे उत्पादन बेण्यावर अवलंबून असते. जर बेणे सशक्त आणि रोगमुक्त असेल, तरच उत्पादनात ७०-८०% यश मिळते.

♦ १. बेणे निवड (Seed Selection) बेणे पूर्णपणे पक्व (९-१० महिने झालेले) असावे. कंद आकाराने मोठे, चकाकी असलेले आणि किमान २-३ डोळे असलेले असावेत. सडलेले किंवा सुकलेले बेणे पूर्णपणे बाजूला काढावे.

♦ २. बेणे प्रक्रिया (Seed Treatment) - कृती लागवडीपूर्वी बेण्याला बुरशीनाशक आणि कीटकनाशकाची प्रक्रिया करणे अनिवार्य आहे. द्रावण तयार करण्याची पद्धत (१०० लिटर पाण्यासाठी):

- बुरशीनाशक : मॅन्कोझेब (Mancozeb) ३०० ग्रॅम किंवा मेटलॅक्सिल (Metalaxyl) २०० ग्रॅम.
- कीटकनाशक: क्विनालफॉस (Quinalphos) २०० मिली (सूत्रकृमी आणि कंदमाशी रोखण्यासाठी).

संजीवक (Optional): ह्युमिक ॲसिड ५०० मिली (चांगल्या मुळ्या फुटण्यासाठी).

- प्रक्रिया : हे द्रावण मोठ्या हौदात तयार करा. आल्याचे कंद या द्रावणात ३० ते ४० मिनिटे बुडवून ठेवावेत. त्यानंतर कंद बाहेर काढून सावलीत कोरडे करावेत आणि मगच लागवड करावी.
- प्रोफेशनल टीप (Success Agro Special) : ट्रायकोडर्मा (Trichoderma viride) २ किलो प्रति १०० लिटर पाण्यात वापरून जैविक प्रक्रिया केल्यास 'सड' रोगावर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवता येते.

♦ ३. बेणे साठवणूक (Storage of Rhizomes)

पुढील हंगामासाठी बेणे साठवून ठेवताना खूप काळजी घ्यावी लागते.

- खड्डा पद्धत: सावलीत किंवा झाडाखाली खड्डा खणावा. खड्ड्याच्या तळाला वाळलेले गवत किंवा कडबा टाकून त्यावर आल्याचे कंद रचावेत.

हवा खेळती ठेवा: कंद रचल्यानंतर त्यावर पुन्हा गवत टाकावे आणि वरून मातीने हलके झाकावे. हवा खेळती राहण्यासाठी मधून मधून छिद्रे ठेवावीत.

- उपचार: साठवणुकीपूर्वी कंदांवर बोर्डो मिश्रण (Bordeaux Mixture) किंवा मॅन्कोझेबची प्रक्रिया केल्यास साठवणुकीत आले सडत नाही.
- कोल्ड स्टोरेज: आधुनिक पद्धतीत ५-१०°C तापमानात आले साठवता येते, परंतु ग्रामीण भागात सावलीत खड्डा पद्धतच जास्त यशस्वी आहे.

# शाळा सुरु करायचीय; संभ्रम कायम

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षक बरीच कामं करतात. कधी बिएलओ तर कधी जनगणना. कधी कोरोनात काम तर कधी प्रशिक्षण देण्याघेण्याचं काम. ही कामं उन्हाळ्यात सुट्या असल्या तरी सुरु असतात. भर उन्हाचा व शिक्षकांनाही उन्हाचा त्रास होईल व तो त्रास सहन होणार नाही याचा विचार न करता. ज्यातून बरीचशी शिक्षक मंडळी मरण पावतात.

दि. १५ जून, जून महिना. ज्या दिवशी शाळा सुरु करायची असा शासनाचा शासन निर्णय. ज्या दिवशी शाळा सुरु होतील. कुठल्या तर त्याला उत्तर आहे, महाराष्ट्रातील. ज्यातून उन्हाळी सुट्ट्या पुष्कळ झाल्या. विद्यार्थ्यांचं नुकसान व्हायला नको म्हणून शासनानं हा निर्णय घेतलाय. परंतु हा निर्णय विदर्भाला मान्य नाही. विदर्भातील मंडळी म्हणतात की दि. १५ जूनपासून शाळा सुरु केल्यास विदर्भातील तापमान कितीतरी प्रमाणात जास्त असल्यानं त्याचा त्रास विद्यार्थ्यांना होणार. म्हणूनच खटले आणि न्यायालयातून निर्णय. तरीही दरवर्षी शाळा सुरु करण्याबाबत संभ्रम आणि तापमानाचा जोर कायमच असतो.

पुर्वी असं नव्हतं. पुर्वी शाळा सुरु करण्याबाबत निश्चित तारीख होती व दरवर्षी शाळा या सव्वीस जुनलाच फुरु व्हायच्या. परंतु



आता शाळेला ग्रहण लागल्यासारखं वाटतंय. ज्यातून टि ई टी आणली. एवढंच नव्हे तर अलिकडील दोनचार वर्षाच्या काळात शाळेच्याच सुरु करण्याच्या तारखेबाबत शासनाच्या धोरणात संभ्रम असतो. कधी शाळा या बारा जुनला तर कधी शाळा या पंधरा जुनला सुरु करण्याचा धाट असतो. शासन शाळा या ढर उन्हाळ्यातच सुरु करु म्हणतात. तसं पाहिल्यास शासनाला शाळा या वर्षभर सुरु असाव्यात असंच वाटत असेल. यात शंका नाही.


शाळा व त्या सुरु करण्याबाबत विचारांचा घोळ. ज्यात दरवर्षी महिनाभर विचार विमर्श चालतो. शाळा या वर्षभरच सुरु असाव्यात असं वाटतं. त्याचं कारण आहे, शिक्षकांचे वाढलेले वेतन. तेच शासनाच्या मनात खलत असतं.

म्हणूनच शाळा या वर्षभर सुरु राहाव्यात असं शासनाला वाटतं. परंतु पर्याय नसतो. उन्हाळा असतो व उन्हाळ्यात उन्हाची तीव्र दाहकता असते. वाटतं की विद्यार्थी शाळेत नक्की येईल. परंतु त्यांची प्रकृती बिघडायला नको. म्हणूनच नाईलाजास्तव शाळा या विदर्भातील तापमान पाहता दरवर्षी बदलाव्या लागतात. ज्याला इलाज नसतो. कारण शाळा या पंधरा जुनला वा बारा जुनला सुरु करायची. हा विचार पाहून सुर्यही खवळतोय. तो मग आग जास्त ओकू लागतोय. याचाच अर्थ असा की ज्या गोष्टी नव्हे तर विद्यार्थ्यांच्या भावना ज्या सुर्याला समजतात. त्या गोष्टी शासनाला का समजत नाही. ही शोकांतिकाच आहे व यावर खऱ्या अर्थानं विचार करण्याची गरज आहे.




सुर्य खवळतोय विदर्भातील शाळा पंधरा जुनला सुरु होत आहे हे समजून? असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण अलिकडील काळातील दोन चार वर्षामध्ये दरवर्षी शासन पंधरा जुनला शाळा सुरु करण्याचा विचार करतं आणि नेमकं त्याच वर्षी विदर्भातील तापमान एवढं वाढतं की सरकारला आपला निर्णय बदलावाच लागतो. ज्यासाठी न्यायालयात खटलाही दाखल करावा लागतो. मग सर्वोच्च न्यायालय निर्णय देतं. निर्णय देतं की विदर्भातील तापमान सर्वोच्च आहे. अशा वातावरणात विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळू नका. शाळा सव्वीस जूनला सुरु करा. मग शाळा सव्वीस जुनला सुरु होतात.

सन २००७ चा तो काळ. ज्यावेळेस शासन शाळा या बारा जूनला सुरु करु म्हणत होतं. त्यावेळेस लोकं सर्वोच्च न्यायालयात गेले. तेव्हाही अशीच शासनाची मते मतांतरे होती. तशीद जिद्द होती की शाळा या बारा जूनलाच सुरु करु. मात्र त्यावर सर्वोच्च न्यायालयानं त्यावेळेस निर्णय दिला. निर्णय दिला की शाळा या विदर्भातील तापमान जास्त असल्यानं तापमानाचा अंदाज घेवून सुरु कराव्यात. त्यावेळेस बहुतांश अंदाजे एक जुलैला शाळा सुरु झाल्या. असं मला वाटते. **(क्रमशः)**



# भाव तेथे देव...

**ज्योतिर्मय साहित्य**

वर्षानुवर्षे माणसाला एका गोष्टीचं कुतूहल लागून आहे ती गोष्ट म्हणजे देव.देव आहे की नाही याचं उत्तर शोधण्यात पिढ्यानपिढ्या निघून गेल्या.पण अद्याप समाधानकारक उत्तर सापडले नाही.देव आहे की नाही या प्रश्नाला केवळ हो/नाही असं उत्तर दिले जाते. पाण्यात साखर विरघळल्यानंतर ती दिसत नाही.पण पाण्याला गोड चव प्राप्त होते.असेच काहीसे देवाच्या अस्तित्वाबाबत आहे.जसे गतीच्या नियमाप्रमाणे पृथ्वी सूर्याभोवती फिरते.पण आपणास सूर्यच फिरतांना भासतो. अवकाशात गेलेल्या माणसाला पृथ्वी सूर्याभोवती फिरत आहे असे दिसते.अशीच उदाहरणे दिली जातात.पण प्रत्येकजण त्याच्या अनुभूती व संकल्पनेप्रमाणे याचे उत्तर शोधत असतो. देव कुठे आहे.हे पाहणाऱ्याच्या दृष्टी व दृष्टिकोनावर अवलंबून असते.माझे मत असे आहे की देव हा प्रत्येक वस्तूत,प्राणिमात्रांत भरून राहिलेला आहे.मनापासून कोणाची मदत करा देव नक्की आपली मदत करतो.




एकदा गोंदवले तीर्थक्षेत्री नामाचे महत्व सांगणारे श्री.ब्रह्मचैतन्य महाराज यांच्या दर्शनासाठी जात होतो.आमचा रस्ता चुकला. आजूबाजूला कोणीच दिसत नव्हते.रस्ताही गुगल नकाशा प्रमाणे जात असता एका नदीजवळ येऊन थांबला. कुणाला काही सुचेना. तेव्हा अचानक पिवळा फेटा बांधलेला व कपाळावर टिळा लावलेला एक हसतमुख व्यक्ती आमच्या कडे येतांना दिसला. जवळ आल्यावर आम्हांला म्हणाला,''तुम्हांला ब्रह्मचैतन्य महाराजांच्या दर्शनास जायचे आहे का ?मग माझ्या मागे मागे गाडी घेऊन या''. आम्ही थक्क झालो आम्ही तसेच गेलो.मुख्य रस्त्याला लावून दिल्यावर तो व्यक्ती कुठेच दिसला नाही. आम्हांला तेच प्रत्यक्ष ब्रह्मचैतन्य महाराज आहेत असे भासले.थोडक्यात ''भाव तेथे देव'' असेच म्हणावे लागेल. असाच वेगवेगळा अनुभव आपणही जीवनात कधीतरी घेतला असेल.त्यालाच देवाचे अस्तित्व समजावे.कुणाच्याही मदतीला धावा.संकटात कुणासाठी देव म्हणून उभे राहा.दुर्बल, अपंग,निराधार व्यक्तीची सेवा करा.जनसेवा हीच ईश सेवा समजा.देव चांगल्या कामाला सहाय्यभूत असतो.माणुसकीचा धर्म श्रेष्ठ समजा.यातच तुम्हांला देवाचे दर्शन घडेल. शेवटी भाव तेथे देव!

# ढोला सादिया (भूपेन हजारिका ) पूल... आज राष्ट्रास अर्पित

**ज्योतिर्मय साहित्य**

आज पंतप्रधानांनी ढोला सादिया ह्या भारतातील सगळ्यात लांब पुलाच उद्घाटन केल. ह्यामागे कोणाच श्रेय हा राजकारणाचा विषय बाजूला ठेवून हा पूल कसा महत्वाचा आहे. हे लक्षात घेण महत्वाच आहे. ढोला आणि सादिया ह्या दोन गावांना जोडणारा पूल खरे तर आसाम आणि अरुणाचल प्रदेश ह्या भारताच्या दोन महत्वाच्या राज्यांना जोडतो. ९.१५ किमी लांबीचा हा पूल संरक्षणाच्या दृष्टीने खूप महत्वाचा आहे. ( मुंबईतील वांद्रे- वरळी सेतूच्या लांबीपेक्षा हा ३.५५ किमी अधिक लांब आहे.)

अरुणाचल प्रदेशवर चीन नेहमी आपला हक्क सांगत आला आहे पण भारताने नेहमीच हा आपला भूभाग असल्याच म्हंटल आहे. चीन शी आपली सीमारेषा ह्या राज्यातून जुळते. तसेच हा प्रदेश भूकंप प्रवण क्षेत्रात असल्याने इकडे असे पूल बांधणे तितकच कठीण आहे. लोहित, ब्रह्मपुत्रा, दिबांग ह्या तीन नद्यांनी वेढलेला हा प्रदेश आहे. अश्या



अभियांत्रिकीच्या दृष्टीने गुंतागुंतीच्या प्रदेशात सामरिक दृष्टीने अतिशय महत्वाचा दुवा हा पूल ठरणार आहे.

हा पूल ५४० किमी दिसपूर जी कि आसाम ची राजधानी आहे तर ३०० किमी इटानगर जी कि अरुणाचल प्रदेश ची राजधानी आहे. तिथे वसलेला आहे. म्हणूनच दळणवळणाच्या दृष्टीने हा पूल एक मैलाचा दगड ठरणार आहे. ह्याचा सगळ्यात मोठा फायदा जर कोणाला होणार असेल तर भारतीय सैन्याला. ह्या आधी भारतीय सैन्याच्या तुकडीला ह्या भागातून बोटीतून प्रवास करावा लागत होता. सीमेवर जाणाऱ्या वाहनांना तर १० तास खर्ची घालून २५० किमी चा वळसा घालून अरुणाचल च्या सीमेवर जाव लागत होत. हे लक्षात ठेवूनच रणगाड्यांच्या वजनाला पेलेल अस ह्याच बांधकाम करण्यात आल. ह्या पुलावरून ६० टन वजनाचा रणगाडा नेला जाऊ शकतो. तसेच ह्याचे १८२ पिलर्स वर सेसमिक बफर्स लावण्यात आले आहेत. ह्यामुळे कोणत्याही आपात स्थिती ची कल्पना आधी मिळण्यास मदत होणार आहे.

ह्या पुलामुळे सीमेवर जाणाऱ्या वाहनांच्या प्रवासात खूप बचत होणार आहे. भारतीय सेनेच्या वाहनांना ज्या प्रवासाला आधी दोन दिवस लागत होते तोच प्रवास आता काही तासांवर आला आहे. दररोज १० लाखांचं इंधन ह्या पुलामुळे वाचल जाणार आहे. इथे राहणाऱ्या अनेक लोकांची प्रचंड सोय ह्या पुलामुळे होणार आहे. एरवी रात्रीच्या प्रवासाठी इथे कोणताही रस्ता उपलब्ध नव्हता तसेच ब्रह्मपुत्रा आवेशात वाहत असताना हा प्रदेशाचा संपर्क पूर्णपणे तुटलेला असायचा पण ह्या पुलामुळे सगळच बदलून जाणार आहे. लष्करी रहदारी सोबत इथली इंडस्ट्री तसेच टुरिझम हि प्रचंड वाढणार आहे. ख्यातनाम गायक भूपेन हझारिका ह्याचं जन्मगाव हे सादिया आहे. म्हणूनच ह्या पुलाला त्यांच्या स्मरणार्थ भूपेन हझारिका ह्याचं नाव देण्यात आल आहे. हे आणि असे अनेक कार्यक्रम राष्ट्राच्या संपूर्ण वाटचालीसाठी खूप महत्वाचे असतात. हे अवघड अस अभियांत्रिकी मधल एक शिखर गाठणाऱ्या सर्वांना सलाम.

(सौजन्य : विनीत वर्तक )


***

# डॉ. य.दि. फडके यांचे साहित्यप्रेम

**ज्योतिर्मय साहित्य**

बांद्रा येथे माझी कन्या स्वरदा ही साहित्य सहवास सोसायटीसमोर रिडेव्हलप झालेल्या अदानी यांच्या गृहनिर्माण सोसायटीत राहते. माझे जावई सौरभ यांची मावशी नीलम खळे या साहित्य सहवास सोसायटीत राहते. प्रसिद्ध साहित्यिक कै. यशवंत दिनकर फडके (य.दि. फडके) यांच्या स्नुषा त्वचारोगतज्ञ डॉ. सौ. वैशाली फडके यांचे आणि स्वरदाच्या सासुबाई सौ. संगीता कुळकर्णी यांचे संबंध जिव्हाळ्याचे. डॉ. वैशाली फडके त्यांचे पती डॉ. अनिरुद्ध फडके लिहित असलेले वेगवेगळे लेख संगिता कुळकर्णी यांना पाठवितात. गेल्या ४-५ महिन्यात लिहिलेले डॉ. अनिरुद्ध फडके यांचे लेख मलाही वाचायला मिळाले. त्यामध्ये सुहास्य तुझे, बिरबल की खिचडी, तुही यत्ता कंची, सारांश, दुसरो न कोई, निळे गगन निळी धरा, जीवनसाथी, आमची कुठेही शाखा नाही, वाटेवर काटे, उदास विचारे वेंच करी, त... तोतयाचा, तुझी माझी धाव आहे, मी मज हरपून, मूषक पुराण, एक चुटकी कॉफी, जाने क्या तुने कही, वेड्या मुसाफिराला, जैसे भ्रमर परागु नेती वाचावयास मिळाले. डॉ. य. दि. फडके यांचे सुपुत्र डॉ. अनिरुद्ध फडके इतके छान लिहितात हे वाचून मला त्यांची भेट घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. डॉ. य. दि. फडके साधारण २००३-२००४ साली साताऱ्याच्या ग्रंथमहोत्सवात येऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण सातारकरांना मंत्रमुग्ध करून गेले होते. मी त्यांना बऱ्याच वेळा पूर्वी भेटलेलो होतो. २००० साली बेळगाव येथे झालेल्या ७३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनात संमेलनाध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांनी मराठी भाषेला केवळ व्यवहाराची नव्हे तर अभिमान, संस्कृती आणि अस्मितेची भाषा मानण्याची भूमिका मांडली. त्यांनी मराठीचा वापर वाढावा, तिचे जतन व्हावे आणि महाराष्ट्राबाहेरही मराठी भाषिकांनी ती जिवंत ठेवावी असा आग्रह धरला. मराठी भाषा ही केवळ संवादाची भाषा नसून मराठी संस्कृती, इतिहास आणि अस्मितेचे प्रतीक असल्याचे सांगितले. मराठीचा वापर सर्व स्तरांवर वाढला पाहिजे तिचे संवर्धन केले पाहिजे आणि नव्या पिढीने तिच्यावर प्रेम करायला हवे, अशी भूमिका त्यांनी मांडली. मराठी भाषेचा सन्मान राखणे हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

डॉ. य. दि. फडके यांचे घर बघण्याची असोशी माझ्या मनात निर्माण झाली. डॉ. अनिरुद्ध फडके आणि डॉ. वैशाली फडके यांनी मला २७ मे २०२६ या तारखेला त्यांच्या घरी भेटण्यासाठी वेळ दिली. मी आणि माझी कन्या स्वरदा त्यांच्याकडे सायंकाळी गेलो आणि कांदेपोहे आणि स्वीटस खात खात त्यांच्याबरोबर झालेल्या गप्पांनी माझी सायंकाळ अविस्मरणीय झाली. डॉ. य.दि. फडके यांचे साहित्यप्रेम, साहित्य दृष्टी आणि त्यासाठी सभोवताल निरखणे हे सर्वच मला डॉ. अनिरुद्ध फडके यांच्याबरोबर एक तास गप्पा मारताना त्यांच्यातही जाणवले. त्यांना भेटेपर्यंत बखर एका डॉक्टरची हे वृतमानस या साप्ताहिकांमधील त्यांनी लिहिलेल्या लेखांचे पुस्तक श्रीविद्या प्रकाशनने १९९९ साली प्रकाशित केलेले आहे हे मला माहित नव्हते. डॉ. अनिरुद्ध फडके हे


डॉ. यशवंत दिनकर फडके
(३ जानेवारी १९३१ - ११ जानेवारी २००८)

गेल्या ३० वर्षाहूनही अधिक काळापासून एम.बी.बी.एस., एम.डी., डी.एन.बी, डी.एम. गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजिस्ट म्हणून कार्यरत आहेत. अतीशय संवेदनशील आणि सर्वांना हवेहवेसे वाटणारे डॉक्टर अनिरुद्ध फडके हे चित्र, शिल्प या कलांचे जाणकार आहेत. मराठी भाषेवर डॉ. य. दि. फडके यांच्याइतकेच प्रेम आणि निष्ठा असणारे हे व्यक्तीमत्व आपल्या बोलण्या-वागण्यातून आणि लिहिण्यातून मराठीपण जपत आहेत. मी त्यांच्याशी चर्चा करताना ओघाओघात सहज विचारले, आपणाकडे डॉ. य. दि. फडके यांनी लिहिलेली ग्रंथसंपदा उपलब्ध आहे का? त्यांनी दिलेले उत्तर मराठी भाषिकांसाठी त्यातही विशेषतः मराठी लेखक मंडळींच्या पुढच्या पिढीसाठी महत्वाचे आहे. डॉ. अनिरुद्ध म्हणाले, माझ्याकडे सर्वात पहिल्यांदा डॉ. य.दि. फडके यांनी त्यांच्या कॉलेज जीवनात लिहिलेले एक पुस्तक वगळता सर्व त्यांची सर्व ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. मला अत्यानंद झाला आणि मी सध्या वाचत असलेले डॉ. य. दि. फडके यांनी संपादित केलेले केतकर लेखसंग्रह या ग्रंथाचा उल्लेख करताच त्यांनी या ग्रंथातील बऱ्याच त्यांनी वाचलेल्या गोष्टी मला सांगितल्या. डॉ. य. दि. फडके यांनी आपल्यापुरते लेखन केलेले नाही तर, समाजामध्ये ज्या ज्या विचारवंत लेखकांनी मराठी भाषेसाठी वेगळेपण निर्माण केलेले आहे त्यासंदर्भातील लेखन करून त्या त्या व्यक्तिमत्वाच्या मोठेपणाचा आणि त्यांनी मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी केलेल्या लिखाणाचे वैशिष्ट्य समाजापुढे मांडलेले आहे. ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांना अवघे ५३ वर्षाचे आयुष्य लाभले. केतकरांच्या हजारो पृष्ठांच्या विविध व विपुल लेखनातून या संग्रहासाठी डॉ. य.दि. फडके यांनी एकूण बावीस उतारे निवडले. पण या बावीस उताऱ्यातून डॉ. केतकर यांच्या विचाराविश्वाचे ओझरते दर्शन आपणाला घडते. डॉ. अनिरुद्ध फडके आम्हाला सांगत होते कि, डॉ. य. दि. फडके यांच्या ग्रंथसंपदेतील बऱ्याच ग्रंथाचे पुर्नप्रकाशन वेगवेगळे प्रकाशक करीत आहेत. मला त्यांनी त्यांचे बखर-एका डॉक्टरची हे पुस्तक भेट दिले.




हे पुस्तक मी वाचल्यानंतर लक्षात आले कि, मी जसे त्यांना म्हणालो कि, तुम्ही तुमच्या डॉक्टर पेशाबरोबरबरच साहित्यक्षेत्रामध्ये झोकून लिखाण करा हे किती खरे आहे ते!. डॉ अनिरुद्ध फडके यांच्या लिखाणात त्यांच्या वडीलांएवढीच लिखाणाची ताकद आहे. साहित्य सहवास या सोसायटीचा एक वाचन कट्टा आहे,ज्या ठिकाणी त्यांचे शनिवार दिनांक ३० मे रोजी व्याख्यान झाले. पण मला अचानक शनिवारी पुण्याला यावे लागल्यामुळे त्यांचे व्याख्यान ऐकण्याची माझी संधी हुकली.

साधनाचे संपादक विनोद शिरसाठ यांना मी दुसऱ्या दिवशी त्यांची मुलाखत मोदीकाळात भारत घडला की बिघडला ? ही थिंक टॅक वर ऐकल्याचे आणि आवडल्याचे फोनवरून सांगत असताना मी डॉ. य. दि. फडके यांच्या साहित्य सहवास मधील घरी जाऊन आल्याचे सांगितले तसेच डॉ. अनिरुद्ध फडके यांच्याशी संवाद साधला हे सांगितल्यावर त्यांनी आनंद व्यक्त करीत डॉ. अनिरुद्ध यांच्या बखर एका डॉक्टरची या पुस्तकाचा आवर्जुन उल्लेख करीत माझ्यापाशी ते काय सध्या लिहित आहेत याबद्दलही विचारणा केली. मी त्यांना गेल्या ४-५ महिन्यात डॉ. अनिरुद्ध फडके यांनी लिहिलेले लेख पाठविले. विनोद शिरसाठ यांना हे लेख नक्कीच आवडतील आणि साप्ताहिक साधना मध्ये डॉ. अनिरुद्ध फडके यांचे लेख सर्व मराठीजनांना वाचायला मिळतील असे मला वाटते. डॉ. अनिरुद्ध फडके यांची मुलाखत सातारकरांना लवकरच ऐकायला मिळेल यासाठी मी प्रयत्नशील आहे. डॉ.अनिरुद्ध फडके यांच्या घरामध्ये काचेच्या कपाटात अगदी व्यवस्थिशीर लावलेली डॉ. य. दि. फडके यांची ग्रंथसंपदा मला डोळ्यासमोर दिसते आहे. असा आनंदझरा आयुष्यात आपणाला वेगवेगळ्या प्रसंगी अचानक मिळत असतो.

**हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)** E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559